सेंट्रल बँक ऑफ इंडिया
सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया
Central Bank of India

मध्यवर्ती कार्यालय : चंद्र मुखी, नरिमन पॉईंट, मुंबई – ४०० ०२१.
एसएएम शाखा, स्टॅन्डर्ड बिल्डिंग, २रा मजला, डॉ. डी एन रोड, फोर्ट, मुंबई– २३.

जंगम/स्थावर मिळकतींच्या विक्रीकरिता विक्री सूचना

अ. क्र.	कर्जदार/हमीदार/गहाणदारांचे नाव आणि शाखेचा संपर्क क्र.	मागणी सूचना तारीख आणि थकीत रक्कम (रु. लाखांत)	मिळकतीचा तपशील	कब्जाचा प्रकार (प्रत्यक्ष/सांकेतिक)	राखीव किंमत/ इअर / बोली वाढ (रु. लाखांत)
९९	**श्री. निपुण सौरभ शर्मा, प्रोप्रा. मे. एचएनजी ॲग्रो प्रॉडक्ट आणि मे. होप इंडिया व्हेंचर शा/का–न्यू पनवेल प्रियंका सिंग मोबा: ८६५५३६३३२५**	३०.१०.२०२३ रु.९९.१८ लाख + व्याज + इतर प्रभार काही असल्यास	प्रॉपर्टी आयडी– सीबीआयएनटीआरओपीएनव्ही११२ रहिवासी फ्लॅट क्र. एफ–६, पहिला मजला, गौरी दर्शन सुपर सीएचएसएल, प्लॉट क्र २, सेक्टर क्र. ११, इंडियन ऑइल पेट्रोलपंप समोर, गाव– न्यू पनवेल, तालुका पनवेल, जिल्हा–रायगड–४१०२०६ बिल्ट अप क्षेत्र ५५० चौ.मीटर (प्रत्यक्ष ताबा अंतर्गत)	प्रत्यक्ष	५५.९१/ ५.५९/ ०.५५/

लिलाव बँकेचे मान्यताप्राप्त सेवा पुरवठादार यांच्या मार्फत घेण्यात येईल: ई–लिलाव एजन्सीचे संकेतस्थळ: https://baanknet.com/. ई–लिलाव एजन्सी संपर्क तपशील आहे:

- **पीएसबी अलायन्स ईबीक्रय हेल्पडेक्स क्र. +९१८२९१२२०२२० ईमेल: support.baanknet@psballiance.com**

बोलीदार नोंदणी आणि इअर प्रदान/परताव्याशी संबंधित चौकशी करिता **ईमेल: support.baanknet@psballiance.com.** कृपया वरील नमूद अधिकाऱ्यांना कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

पुरेशा आधी खालील औपचारिकता पूर्ण कण्याचा बोलीदारांना सल्ला देण्यात येत आहे.

टप्पा १: बोलीदार/खरेदीदारांची नोंदणी : बोलीदारांनी त्यांचा मोबाईल नंबर आणि ईमेल आयडी वापरुन ई–लिलाव प्लॅटफॉर्म **https://baanknet.com/** वर नोंदणी करायची आहे.

टप्पा २: केवायसी पडताळणी : ई–केवायसीचा भाग म्हणून दस्तावेज सिस्टमद्वारे पडताळले जातील.

कृपया नोंद घ्यावी की, टप्पा १ आणि २ हे पूर्वी पुरेशा आधी बोलीदारांनी पूर्ण करणे आवश्यक आहे.

टप्पा ३: इअर रकम: इच्छुक बोलीदारांनी/ खरेदीदारांनी ई–लिलावाच्या वेळे पूर्वी/दरम्यान आधीच ग्लोबल इएमडी वॉलेट मध्ये ऑनलाईन मोड (म्हणजेच एनईएफटी/ट्रान्सफर/युपीआय/नेट बँकींग) चा वापर करुन इअर हस्तांतर करावे. जर ईएमडी रक्कम ग्लोबल ईएमडी वॉलेट मध्ये उपलब्ध नसल्यास प्रणाली बोली लावण्यास नाकारतील. नोंदणी, केवायसी दस्तावेजाची पडताळणी आणि वॉलेट मध्ये ईएमडीच्या हस्तांतर लिलाव वेळेच्या अगोदर पुरेसे आगाऊ वेळेत पूर्ण केला पाहिजे. बोलीदार एकतर एक किंवा सर्व मिळकती साठी प्रस्ताव देवू शकतात. त्यांचा वॉलेट मध्ये पुरेसे ईमडी जमा केल्या नंतरच इच्छुक बोलीदारांना ई–लिलावाच्या तारखेस बोली लावण्यास होईल.

बोलीदाराच्या ग्लोबल वॉलेट मध्ये बोली करण्याच्या वेळी पुरेसा उर्वरित रक्कम (>=ईएमडी रक्कम) असले पाहिजे. जर एका पेक्षा जास्त मिळकत साठी प्रस्ताव दिल्यास बोलीदाराला प्रत्येक मिळकत करिता ईएमडी जमा करायचे आहे. यासाठी बँकिंग प्रक्रिया नुसार काही वेळ लागणार आणि म्हणून बोलीदारांनी, त्यांच्या स्वतःच्या हितासाठी, शेवटच्या वेळी कोणत्याही समस्या टाळण्यासाठी पुरेसे आगोदर बोली पूर्व ईएमडी रक्कम सादर करण्यास सल्ला देण्यात येत आहे.

प्रक्रियेदरम्यान ईअर/बोली करीता https://baanknet.com/ येथे उपलब्ध मार्गदर्शन तत्वांचे अनुपालन करावे.

टप्पा ४: बोली प्रक्रिया आणि लिलावाचे निष्कर्ष: इच्छुक नोंदणीकृत बोलीदार टप्पा १, २ आणि ३ पूर्ण झाल्यावर ई–लिलाव प्लॅटफॉर्मवर ऑनलाईन बोली करु शकतात.

जर कोणत्याही मिळकतीकरिता एकच बोलीदार असेल, एकमेव बोलीदाराने ई–लिलावात भाग घेणे आवश्यक आहे आणि त्याचा/तिचा/त्यांचा प्रस्ताव हा किमान सदर मिळकती संबंधित वरील तक्त्यात नमुद बोली वाढविण्याच्या रकमेच्या समान रक्कम वाढविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास ते यशस्वी बोलीदार म्हणून घोषित करण्यास हक्कदार नसतील.

बोली सादर करण्यापूर्वी मत्ता आणि तपशील बाबत स्वतःचे निरिक्षण करणे आणि त्यांचे समाधान करणे ही बोलीदारांची जबाबदारी असेल.

प्राधिकृत अधिकारी/बँक त्यासंबंधी कोणतेही कारण न देता लिलाव पुढे ढकलणे/रद्द करणे किंवा कोणत्याही अटी आणि शर्तींमध्ये बदल करणेसाठी अधिकार राखून ठेवले आहेत.

प्राधिकृत अधिकारी उच्चतम बोली स्विकारण्यास बांधील नाही आणि प्राधिकृत अधिकारी यांना कोणत्याही किंवा सर्व प्रस्ताव स्विकारणे किंवा नाकारणे किंवा त्यासंबंधी कोणतेही कारण न देता ई–लिलाव स्थगित ठेवणे/पुढे ढकलणे/रद्द करणे याची निर्विवाद अधिकार आहे.

स्वतःच्या हितसंबंधापोटी बोलीदारांने शेवटच्या क्षणात बोली लावणे टाळावे कारण सेंट्रल बँक ऑफ इंडिया किंवा सेवा पुरवठादार कोणतीही चूक/अपयश (इंटरनेट फेल्युर पॉवर फेल्युर, इ.) साठी जबाबदार नसेल. अशा आकस्मिक परिस्थितीपासून बचाव करण्यासाठी बोलीदारांने पॉवर सप्लाय बँक अप इ. सारख्या सर्व आवश्यक व्यवस्था/पर्यायी करण्यासाठी विनंती आहे, जेणे करून अशा परिस्थितीपासून बचाव करता येईल आणि यशस्वी रित्या लिलावामध्ये भाग घेवू शकता.

प्राधिकृत अधिकारी च्या उच्चतम माहिती नुसार मिळकतीवर कोणत्याही भार नाही. तथापि, इच्छुक बोलीदाराने त्यांचे बोली सादर करण्यापूर्वी लिलावावर ठेवलेल्या मिळकतीवर भार, नामाधिकार आणि मिळकतीच्या बाधीत दावे/हक्क/देय संबंधित स्वतःच्या तपासणी करावे. ई–लिलाव जाहिरात बँकेच्या कोणत्याही जबाबदारी किंवा विधान म्हणून गृहित धरले जावू शकत नाही आणि समाविष्टीत नाही. मिळकत बँकेला ज्ञात किंवा अज्ञात वर्तमान आणि भविष्यातील बोजासह विकण्यात येईल. प्राधिकृत अधिकारी/तारण धनको कोणत्याही त्रयस्थ पक्षकार दावे/हक्क/देय साठी कोणत्याही प्रकारे जबाबदार नसेल.

कृपया लिलावाच्या दरम्यान इअर/बोलीच्या भरणाकरिता https://baanknet.in येथे उपलब्ध मार्गदर्शक तत्वाचा अवलंब करावा.

* कृपया बोली प्रक्रिया सुरु करण्यापूर्वी वेबसाईटवर उपलब्ध वापरकर्ता पुस्तिका काळजीपूर्वक वाचावे. बोली प्रक्रिया दरम्यान उद्भवलेल्या समस्यांकरिता बँक जबाबदार राहणार नही.

हे नोंद घेणे महत्वाचे आहे की, लिलाव खरेदीदाराने वरिल बोली रक्कमच्या वर आणि वगळुन मिळकती संबंधित सध्याच्या आणि भविष्यातील विक्री प्रमाणपत्र, नोंदणी प्रभार, सर्व सरकार/कोणतेही प्राधिकरणाकडे देय असलेले सर्व सांवेधिक देय, कर, जीएसटी आणि इतर प्रभार समाविष्टीत मुद्रांक शुल्क भरायचे आहे. विक्रीच्या तपशिलवार अटी आणि शर्तींकरिता आमच्या बँकेची वेबसाईट **www.centralbankofindia.bank.in** वर दिलेल्या लिंकचा संदर्भ घ्यावा.

ठिकाण : मुंबई — **प्राधिकृत अधिकारी, सेंट्रल बँक ऑफ इंडिया**
दिनांक : ०७.०५.२०२६ — **ईमेल– agmifb3873@centralbank.co.in**

सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया
Central Bank of India
CENTRAL TO YOU SINCE 1911
Azadi Ka Amrit Mahotsav

प्रादेशिक कार्यालय, अहिल्यानगर

पी–५६, एमआयडीसी नागापूर, अहमदनगर–४१४ १११ फोन– ०२४१–२७७९०८०

ई–लिलाव विक्री सूचना (सरफैसी ॲक्ट–२००२ अंतर्गत)

परिशिष्ट–IV–ए नियम ८(६) साठी तरतूदी पहा

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) सहवाचता ९(१) अंतर्गत स्थावर तारण मत्तेच्या विक्रीसाठी पंधरा दिवसांची सूचना

प्रति,

कर्जदाराचे नाव : श्री. मोहम्मद जुनेद कादरी
हमीदाराचे नाव : शेख रशिद अब्दुल अजीज

पत्ता : सीटीएस क्र. १८८०, क्षेत्र ३६२.९० चौ. मी. बिल्ट अप क्षेत्र ५५.०० चौ. मी., अहमदनगर शहर, ता. नगर, जि. अहिल्यानगर येथे स्थित, शेख राशिद अब्दुल अजीज यांच्या मालकीचे.

संदर्भ – सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट–२००२ सहवाचता सिक्युरिटी (एन्फोर्समेंट) रुल्स–२००२ च्या नियम ८(६) च्या तरतुदींच्या अंतर्गत ई–लिलाव विक्री सूचना.

सर्वसामान्य जनता आणि विशेषतः कर्जदार आणि हमीदार यांना सूचना याद्वारे देण्यात येते की, खालील विर्णिलेली स्थावर मिळकत तारण धनकोकडे गहाण/प्रभारित आहे, जिचा अन्वयिक/सांकेतिक/प्रत्यक्ष कब्जा सेंट्रल बँक ऑफ इंडिया (तारण धनको) च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, ती (श्री.

मोहम्मद जुनेद कादरी) यांचेकडून तारण धनकोंना थकीत रु. ३५११४१७.००/– + व्याज आणि प्रभार (रुपये सोळा लाख चार हजार चारशे बावन्न मात्र) च्या वसुलीकरिता ऑनलाइन पोर्टल https://www.ebkray.in किंवा https://www.baanknet.com मार्फत **३०.०५.२०२६** रोजी ''जे आहे जेथेआहे'', ''जे आहे जसे आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' तत्वाने विकण्यात येणार आहे.

राखीव किंमत रु. ५५००००००/– (रुपये पंचावन्न लाख मात्र) असेल आणि इसारा अनामत रक्कम रु. ५५००००/– आणि बोली वाढ रक्कम रु. १००००/– असेल.

स्थावर मिळकतीचे वर्णन

मिळकतीचे मालक : शेख राशिद अब्दुल अजीज

मिळकतीचे वर्णन :

सीटीएस क्र. १८८०, क्षेत्र ३६२.९० चौ. मी. बिल्ट अप क्षेत्र ५५.०० चौ. मी., अहमदनगर शहर, ता. नगर, जि. अहिल्यानगर येथे स्थित, शेख राशिद अब्दुल अजीज यांच्या मालकीचे.

पूर्व	रस्ता	उत्तर	सीटीएस क्र. १८८३, १८८२ए, १८८१, १८७९, १८७८
पश्चिम	रस्ता	दक्षिण	सय्यद यासिन यांची मिळकत

विक्रीच्या तपशिलवार अटी आणि शर्तींकरिता कृपया तारण धनकोंची वेबसाईट **www.centralbankofindia.co.in/eauction** मध्ये दिलेल्या लिंकचा संदर्भ घ्यावा.

प्राधिकृत अधिकारी
सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया
०७.०५.२०२६ — **प्रादेशिक कार्यालय, अहिल्यानगर**

जाहीर सूचना

याद्वारे सर्वसाधारण जनतेस सूचित करण्यात येते की, आम्ही (१) २५ वेस्ट रिअल्टी प्रायव्हेट लिमिटेड (यापूर्वी 'अवधारणा इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड' म्हणून ज्ञात असणारी), कंपनी अधिनियम, १९५६ च्या तरतुदीन्वये नोंदणीकृत असलेली एक खाजगी मर्यादित कंपनी असून जिचे नोंदणीकृत कार्यालय : ४०४, ट्रान्झिट कॅम्प क्र. ३, सी.टी.एस. क्र. बी–१०८, माऊंट मेरी हिल, वांद्रे (पश्चिम), मुंबई - ४०० ०५० येथे आहे आणि (२) एनएचपी रियल्टी एलएलपी, 'मर्यादित दायित्व भागीदारी अधिनियम, २००८' च्या तरतुदींनुसार प्रस्थापित असलेली एक मर्यादित दायित्व भागीदारी पेढी असून जिचे नोंदणीकृत कार्यालय : ५०१–बी, सिम्फनी, नेहरू रोड, विले पार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०५७ येथे आहे, यांच्या यात याखाली लिहिलेल्या **परिशिष्टामध्ये** अधिक विशेषरित्या वर्णन केलेल्या जागेच्या (''**जागा**'') संबंधातील अधिकार, हक्क आणि हितसंबंधांची पडताळणी आणि चौकशी करीत आहोत.

सर्व व्यक्ती/संस्था तसेच अन्य गोष्टींबरोबर कोणतीही व्यक्ती, हिंदू अविभाजित कुटुंब, कंपनी, बँका, आणि/किंवा वित्तीय संस्था, नॉन–बँकिंग वीत्तिय संस्था, न्यास, पेढी, व्यक्तींच्या समित्या किंवा व्यक्तिगत निकाय प्रस्थापित किंवा अ–प्रस्थापित, ऋणको, धनको आणि/किंवा अन्य कोणतेही प्राधिकरण यांना जागेच्या किंवा त्यातील कोणत्याही भागाच्या संबंधातील विक्री, हस्तांतरण, अभिहस्तांकन, अदलाबदल, गहाण, आकार, मृत्युपत्रीत देणगी, समन्याय सुविधाधिकार, प्रतिज्ञा, भाडेदारी, अनुज्ञप्ती, प्रलंबित वाद, धारणाधिकार, बक्षिस, न्यास, वारसा, कब्जा, भाडेपट्टा किंवा भार, पोट–भाडेदारी, काळजीवाहू तत्व, भोगवटा, कब्जा, कुटुंब व्यवस्था/तडजोड, एफएसआय वापर किंवा टीडीआर, विकास अधिकार, भागिदारी, कोणत्याही न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश, करार/करारनामे आणि/किंवा एखादे दायित्व आणि/किंवा एखादे लिखित आणि/किंवा एखादी व्यवस्था आणि/किंवा कोणतीही बांधिलकी किंवा जागांच्या संबंधातील अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणताही दावा, अधिकार, हक्क, हितसंबंध, शेअर, मागणी असेल तर त्यांनी निम्नस्वाक्षरीकर्त्यांना या जाहीर सुचनेच्या जाहिरातीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सर्व पाठींबा देणाऱ्या दस्तऐवजांसह लेखी स्वरूपामध्ये ज्ञात होण्यासाठी कळवावे, अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे. अन्यथा त्यातील अशा प्रकारचा दावा, अधिकार, हक्क किंवा हितसंबंध यांचा अधित्याग आणि/किंवा परित्याग आणि/किंवा अधित्यजन करण्यात आलेले आहे, असे समजण्यात येईल आणि ते कोणत्याही पद्धतीने बंधनकारक रहाणार नाहीत.

यात यावरील संदर्भित केलेले परिशिष्ट :

(जागेचे वर्णन)

फ्लॅट क्र. २९०२, क्षेत्रफळ २४५.५८ चौरस मीटर (रेरा चटई क्षेत्र) तसेच अतिरिक्त वापरण्यायोग्य क्षेत्र, १४.०३ चौरस मीटर (चटई क्षेत्र एफएसआय मध्ये समावेश आहे) , एकूण क्षेत्रफळ २५९.६१ चौरस मीटर (चटई क्षेत्र एफएसआय मध्ये समावेश आहे), २९वा मजला (१९वा निवासी मजला), ए (पूर्व) विभाग, ''ट्वेंटी फाईव्ह वेस्ट'' म्हणून ज्ञात असणारी बांधकामाधीन इमारत तसेच ४ (चार) कार पार्किंग जागा, म्हणजेच पझल/यांत्रिक प्रणालीमधील ३ (तीन) कार पार्किंग जागा आणि उपरोक्त इमारतीच्या पोडियममधील १ (एक) कार पार्किंगची जागा. सदर इमारत माउंट मेरी हिल, काडेश्वरी मंदिर मार्ग, वांद्रे (पश्चिम), मुंबई - ४०० ०५० येथील गाव बांद्रा 'बी', तालुका अंधेरी, नोंदणी जिल्हा व उप–जिल्हा मुंबई उपनगरातील सीटीएस क्र. बी/९०८, बी/९०९, बी/९१० आणि बी/९११ (भाग) च्या जमिनी च्या त्या सर्व तुकड्यावर आणि भागावर बांधकामाधीन असलेली इमारत.

आज दिनांक ७ मे,२०२६
करीता

LEXICON LAW PARTNERS
ADVOCATES & SOLICITORS
मुल्ला हाऊस, चौथा मजला,
५१, एम. जी. मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४००००१.
ईमेल आय डी : objections@lexiconlaw.in
सही/–
भागिदार

Can Fin Homes Ltd
(Sponsor: CANARA BANK)
HOME LOANS • DEPOSITS
Translating Dreams into Reality

एफ–१२, पहिला मजला, सुयोजीत संकुल, बाफणा ज्वलर्सच्या वर, शरणपुर रोड, नाशिक–४२२००२.
फोन– ०२५३–२३१८३०५ ईमेल– nashik@canfinhomes.com

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेसाठी) [(नियम ८(१)]

त्यांनी कॅनफिनहोम्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी म्हणून, सिक्युरिटायझेशन अँडरिकन्स्ट्रक्शनऑफफायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्सफेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट अंतर्गत स्वाक्षरी केली आहे आणि सदर कायदा आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्सफेंट) रूल्स, २००२ अंतर्गत मिळालेल्या अधिकारांचा वापर करून, खालील तारखांना एक मागणी सूचना जारी केली आहेज यामध्ये खालील कर्जदार/सह–कर्जदार/ जामीनदारांना सदर नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत वसुलीच्या तारखेपर्यंत करारा नुसार व्याज दराने पुढील व्याजासह सूचनेमध्ये नमूद केलेली रक्कम परत करण्याचे आवाहन केले आहे.

कर्जदारांनी रक्कम परत फेडकरण्यात अयशस्वी ठरल्याने, कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येत आहे की, खाली नमूद केलेल्या तारखांना, सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोसर्फेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ सह वाचलेल्या सदर कायद्याच्या कलम१३(४) अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून, प्रत्येक कर्जदारा विरुद्ध येथे वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

अ. क्र.	कर्जदार आणि सह–कर्जदारांची नावे	मालमत्तेच वर्णन	मागणी सूचनेची तारीख	थकबाकीची रक्कम	ताब्यात घेण्याची तारीख
1	**कर्जदार– सौ. संजिवनी रामदास गांगुर्डे व श्री. जगदीश रामदास गांगुर्डे**	फ्लॅट ९, दुसरा मजला, 'विजय रेसिडेन्सी अपार्टमेंट', प्लॉट नं. २६+२७, स.नं. ४६/१+२+३+४/१, वॉटर टँकजवळ, गाव आनंदवल्ली, ता. व जि. नाशिक–४२२०१३. **चतु:सिमा– पुर्वेस:** ओपन प्लॉट, **पश्चिमेस:** मुख्य रोड, **दक्षिणेस:** ओपन प्लॉट, **उत्तरेस:** ओपन प्लॉट	०२.०३.२०२६	**रू. 18,03,918/-** (अठरा लाख तीन हजार नऊशे अठरा फक्त)	०४.०५.२०२६

कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप–कलम (८) मधील तरतुदींकडे आकर्षित केले जाते, उपलब्ध वेळेच्या संदर्भात, सुरक्षित मालमत्ता परत करण्यासाठी. कर्जदारांना विशेषतः आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे मालमत्तेशी व्यवहार करू नये अशी ताकीद देण्यात येते आणि मालमत्तेशी कोणताही व्यवहार केल्यास प्रत्येक मालमत्ते विरुद्ध नमूद केलेल्या रकमेसाठी कॅन फिन होम्स लि. ला शुल्क आकारले जाईल आणि वसुली तारखेपर्यंत त्यावरील पुढील व्याज आकारले जाईल.

दिनांक : ०६.०५.२०२६ । ठिकाण : नाशिक

[टिप: स्थैर भाषांतर, तफावत असल्यास इंग्रजी ग्राह्य.]

सही/– **अधिकृत अधिकारी**
कॅन फिन होम्स लि.

ICICI Bank

शाखा कार्यालय : आयसीआयसीआय बँक लिमिटेड, तळ मजला, आक्रुती सेंटर, एमआयडीसी, टेलिफोन एक्सचेंज जवळ, आक्रुती स्टारच्या समोर, अंधेरी पूर्व, मुंबई– ४०००९३

जाहीर सूचना – तारण मत्तेच्या विक्रीसाठी निविदा ई– लिलाव

[नियम ८(६) चे तरतुदीकडे पहा]

स्थावर मिळकतीच्या विक्रीकरिता सूचना

वित्तीय मालमत्ततेचे सिक्युरिटायझेशन आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी अधिनियम, २००२ अन्वये तसेच सुरक्षा हितसंबंध (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८(६) च्या परंतूकासह स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई–लिलाव विक्री सूचना.

सर्वसामन्य लोक आणि विशेषत: कर्जदार आणि हमीदार यांना सूचना देण्यात येत आहे की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता जी सिक्युअर्ड क्रेडीटर यांच्याकडे गहाण/ चार्ज्ड करण्यात आली असुन, त्याचा **प्रत्यक्ष ताबा** आयसीआयसीआय बँक लि.चे अधिकारी यांनी घेतला असून ती ''जसे आहे जिथे आहे'', ''जे आहे ते आहे '' आणि ''तेथे जे असेल ते '' या आधारे होणार आहे, त्याचे तपशील खाली देण्यात आले आहेत.

अ. क्रं.	कर्जदाराचे/सह–कर्जदाराचे/ हमीदाराचे नाव/ कर्ज खाते क्रमांक	काही असल्यास ज्ञात बोजासह तारण मत्तेचा तपशील	थकबाकी रक्कम ₹	आरक्षित मूल्य (₹) / इसारा अनामत ठेव ₹	मालमत्तेच्या परीक्षणची तारीख आणि वेळ	ई–लिलाव तारीख आणि वेळ
(ए)	(बी)	(सी)	(डी)	(ई)	(एफ)	(जी)
1.	श्री सुरेश सुओम पवार (कर्जदाराचे), कर्ज खाते क्रमांक– TBTNE00006270525 LBTNE00006351169	फ्लॅट क्र. ३०२, तिसरा मजला, गॅलेक्सी अपार्टमेंट, प्लॉट क्रमांक बी ८७, सेक्टर क्र. ०८, उल्वे येथे स्थित, तालुका पनवेल, जिल्हा रायगड, नवी मुंबई– ४१०२०६. मोजमापित क्षेत्र– १९.०४२ चौ. मी. कार्पेट एरिया + २.७८८ चौ.मी. छज्जा एरिया	₹ ३५,५५, १५२/- (मे ०४, २०२६ पर्यंत)	₹ १९,००, ०००/- / ₹ १,९०, ०००/-	मे १४,२०२६ सकाळी ११:०० ते दुपारी ०२:०० पर्यंत	मे २७,२०२६ सकाळी ११:०० पासून
2.	श्री प्रविण अधिकराव कांबळे (कर्जदाराचे), श्रीमती वृषाली प्रवीण कांबळे (सह–कर्जदाराचे) कर्ज खाते क्रमांक– LBPVL00005417558 TBPVL00007107097	फ्लॅट क्र. २०२, दुसरा मजला, सेक्टर ५२, साई तारा, प्लॉट क्र. ७८, गाव द्रोणागिरी, तालुका उरण, नवी मुंबई, रायगड– ४००७०२. मोजमापित क्षेत्र– सुमारे २१.४०५ चौ. मी. कार्पेट क्षेत्र + २.१३८ चौ. मी. एफ.बी. + २.६२५ चौ. मी. प्रक्षेपित टेरेस क्षेत्र	₹ २१,८४, ३०७/- (मे ०४, २०२६ पर्यंत)	₹ १३,५०, ०००/- / ₹ १,३५, ०००/-	मे १५,२०२६ दुपारी ०२:०० ते संध्याकाळी ०५.०० पर्यंत	मे २७,२०२६ सकाळी ११:०० पासून

ऑनलाईन लिलाव वेबसाईट– **(https://disposalhub.com) मे. नेक्सझेन सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेड** या ई–लिलाव एजन्सीच्या वेबसाईटवर आयोजित करण्यात येईल. तारणदार/नोटीसी यांना **मे २६, २०२६** रोजी **संध्याकाळी ०५.००** वाजणेपूर्वी एकूण थकबाकी आणि पुढील व्याजासह रक्कम परतफेड करण्याची संधी देण्यात येत आहे. अन्यथा सदर तारण मालमत्तावरील परिशिष्टाप्रमाणे विक्री करण्यात येईल.

संभाव्य बोलीदारांनी बयाणा रक्कम (ईएमडी) **आयसीआयसीआय बँक लिमिटेड, लेवल ३-५, ७४ टेक्नो पार्क, सीप्झ गेट क्रमांक ०२ समोर, मरोल एमआयडीसी, अंधेरी पूर्व, मुंबई- ४०००९३** यांचेकडे डीमांड ड्राफ्ट (डीडी) (कॉलम ई पहा) **मे २६, २०२६** रोजी **संध्याकाळी ०४.००** वाजणेपूर्वी सादर करावी आणि त्यानंतर त्यांनी त्यांचा प्रस्ताव फक्त वर नमूद वेबसाईटमार्फत **मे २६, २०२६** रोजी **संध्याकाळी ०५.००** वाजणेपूर्वी ईएमडीच्या पैसे भरल्याच्या पुराव्यासाठी बँक पोचसह– डीडीची स्कॅन केलेल्या ईमेजसह सादर करणे आवश्यक आहे. कृपया नोंद घ्यावी, जर संभाव्य बोलीदारांना वेबसाईटमार्फत त्यांचे प्रस्ताव सादर करणे शक्य नसल्यास, स्वाक्षरीकृत निविदा दस्तावेजाची प्रत **आयसीआयसीआय बँक लिमिटेड, लेवल ३-५, ७४ टेक्नो पार्क, सीप्झ गेट क्रमांक ०२ समोर, मरोल एमआयडीसी, अंधेरी पूर्व, मुंबई- ४०००९३** येथे **मे २६, २०२६** रोजी **संध्याकाळी ५.००** वाजणेपूर्वी सादर करता येतील. बयाणा रक्कम राष्ट्रीयकृत/वर्गीकृत बँकेकडील डीडी/पीओ **''आयसीआयसीआय बँक लिमिटेड''** यांच्या नावे **मुंबई** येथे देय सादर करावा.

पाहणीसंबंधित, ई–लिलावाच्या शर्ती व अटी किंवा निविदा सादर करण्याशी संबंधित कोणत्याही खुलाशाकरिता कृपया संपर्क **आयसीआयसीआय बँक** कर्मचारी फोन नंबर **८४५४०८९३५३/ ९००४३९२४१६** वर संपर्क करा.

कृपया नोंद घ्यावी की मार्केटिंग एजन्सी **१. व्हॅल्यूट्रस्ट कॅपिटल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, २. ऑजिओ ॲसेट्स मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड, ३. मॅटेक्स नेट प्रायव्हेट लिमिटेड, ४. फिनविन इस्टेट डील टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड, ५. गिरनारसॉफ्ट प्रायव्हेट लिमिटेड ६. हेक्टा प्रॉप टेक प्रायव्हेट लिमिटेड, ७. आर्का एमार्ट प्रायव्हेट लिमिटेड, ८. नोव्हेल ॲसेट सर्व्हिस प्रायव्हेट लिमिटेड, ९. नोब्रोकर टेक्नॉलॉजीज सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड, १०. नवोदयन प्रॉपटेक प्रायव्हेट लिमिटेड** यांनादेखील सदर मालमत्तेच्या विक्री सुविधेसाठी नेमण्यात आले आहे.

कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व बोली स्विकारणे किंवा नाकारणेचा अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे राखीव आहे.

विक्रीच्या विस्तृत शर्ती व अटींकरिता कृपया भेटा **www.icicibank.com/n4p4s**

दिनांक : मे ०७, २०२६, ठिकाण : मुंबई — **प्राधिकृत अधिकारी, आयसीआयसीआय बँक लिमिटेड**

डॉईश बँक एजी

जाहीर सूचना – मिळकतीची लिलाव नि विक्री

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२
अन्वये स्थावर मिळकतीची विक्री

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे मे. डॉईश बँक एजी, त्याच्या व्यवसायाचे एक ठिकाण येथे निरलॉन नॉलेज पार्क, बी१, २रा मजला, गोरेगाव पूर्व, मुंबई – ४०० ०६३ (**''डॉईश बँक एजी''**) चे प्राधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस ॲड एन्फार्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (**''ॲक्ट''**) च्या कलम १३(२) सहवाचता सिक्युरीटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ (रुल्स) च्या नियम ३ अन्वये मागणी सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांत त्यावरील व्याज आणि **०८/०९/२०२४** रोजीस **रु. ४२१५३७६२/– (रुपये चार कोटी एकवीस लाख त्रेपन्न हजार सातशे बासष्ट मात्र)** ची थकबाकी रक्कम चुकती करण्यासाठी कर्जदार/सह–कर्जदारांना बोलविण्याकरीता कर्जदार **एन्वायरो सेफ्टी प्रायव्हेट लिमिटेड, निधी खुल्लर आणि संदीप प्रभाकर दिवटे,** राहतात येथे बी१०२ ब्रेंट फोर्ड बिल्डिंग, हिरानंदानी इस्टेट, घोडबंदर रोड, ठाणे ४००६१० यांना **२३ सप्टेंबर, २०२४** दिनांकीत मागणी सूचना जारी केली होती.

थकबाकी रकमेची परतफेड करण्यात कर्जदार असमर्थ ठरले. कर्जदार आणि सामान्य नागरिकांना कळविण्यात येते की, सदर ॲक्टच्या नियम ८ सहवाचता ॲक्टच्या कलम १३(४) अन्वये निम्नस्वाक्षरीकारांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून सदर थकबाकी रकमेची वसुली करण्याकरिता खालील उल्लेखित बँकेसह गहाण मिळकतीचा कब्जा घेतला.

आता सर्वसामान्य जनतेला याद्वारे कळविण्यात येते की, मिळकत खाली वर्णन केलेल्या अटी व शर्ती आणि प्रक्रियेनुसार मोहोरबंद पाकिटातून बोली मागवून **११ जून, २०२६ रोजी दु.४ वा.** डॉईश बँक एजी, निरलॉन नॉलेज पार्क, बी१, २रा मजला, गोरेगाव पूर्व, मुंबई – ४०० ०६३ येथे ''जे आहे जेथे आहे'' तत्त्वाने आणि ''जे आहे जसे आहे'' तत्त्वाने विकण्यात येईल.

अ. क्र.	तारण मिळकतीचा पत्ता	राखीव किंमत	इअर	लिलाव दिनांक
१.	शॉप क्र. टीए–१, ३रा मजला, लेक सिटी मॉल ए विंग, समतनगर घोडबंदर रोड, माजिवडा नाका, ठाणे पश्चिम, ठाणे – ४००६०७ चे ते सर्व भाग आणि विभाग, मोजमापित ८३७ चौ. फू. चटई क्षेत्र	रु. १,६०,००,०००/–	रु. १६,००,०००/–	११ जून, २०२६

मिळकतीच्या संबंधातील तपशील बँकेच्या सर्वोत्तम माहिती आणि समजुतीप्रमाणे वर्णन केले आहेत, तथापि सदर तपशिलांमधील कोणत्याही त्रुटी, गैरविधाने किंवा उणिवांसाठी ती जबाबदार नसेल. म्हणून निविदाकार/प्रस्तावकर्ते/संभाव्य बोलीदार/खरेदीदार यांनी त्यांच्या स्वत:च्या हितासाठी निविदा सादर करण्यापूर्वी मिळकतीच्या संबंधातील त्यांची स्वत:ची खात्री करून घ्यावी. बँकेच्या सर्व